पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

बुलडाणा

● वर्ष १ ● अंक ११२ ● मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ३ ● पृष्ठे ४

RNI No.- MAHMAR/ 26 /A3072 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com

## »थोडक्यात

### संकटात धसलेली अमेरिका जगालाही घेऊन बुडणार!

**नवी दिल्ली :** सोमवारी अमेरिकेच्या १०-वर्षीय ट्रेझरी यील्डने २०२३ नंतर पहिल्यांदा ५ टक्के टप्पा गाठला. या दरम्यान, गेल्या दोन आठवड्यांत परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारात १४,४०० कोटींपेक्षा जास्त किमतीच्या शेअर्सची विक्री केली असून अमेरिकेची मध्यवर्ती बँक, फेडरल रिझर्व्ह, या आठवड्यात धोरणात्मक दरांचा आढावा घेईल त्यामुळे येत्या काही दिवसांत हा वेग वाढू शकतो. जागतिक कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या तीव्र वाढीमुळे सरकारी रोख्यांच्या किमतींवर दबाव आला असून वॉल स्ट्रीटवरील सोमवारी सकाळच्या सत्रात परतावा ०.०३ टक्के वाढून ५ टक्के झाला. बॉन्डच्या किमती घसरल्याने उत्पन्न वाढते, तर गुंतवणूकदार आणि अमेरिकी सरकार या दोघांसाठीही ५ टक्केपर्यंत पोहोचणे निर्णायक मानले जात आहे. जगभरात बॉन्डची विक्री वाढत असून वाढती महागाईची चिंता आणि सरकार व कंपन्यांनी घेतलेले वाढीव कर्ज यामुळे दबाव अधिकच तीव्र होत आहे.



# मनोज जरांगे पाटील मुंबईकडे रवाना!

## तिसऱ्यांदा मागितली परवानगी

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील आज, १५ सप्टेंबर रोजी मुंबईच्या दिशेने रवाना झाले आहेत. त्यांच्या उपोषणाचा आज १८ वा दिवस असून, मोजक्या समर्थकांसह अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे त्यांनी कूच केले आहे. मात्र, मुंबईत आंदोलन करण्यासाठी पोलिसांची परवानगी मिळण्याचा मार्ग अद्याप मोकळा झालेला नाही. मुंबई पोलिसांनी यापूर्वी आंदोलनाची परवानगी नाकारली असून, रविवारी परवानगी नाकारल्यानंतर जरांगे पाटील यांच्या वतीने तिसऱ्यांदा अर्ज दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आंदोलनाला परवानगी मिळण्याची शक्यता कमी असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबई आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सध्या परवानगीचा मुद्दा महत्त्वाचा ठरला आहे. गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक उत्सव, गणेशमूर्तींच्या मिरवणुका आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या काळात शहरातील रस्त्यांवर मोठी गर्दी होत असल्याने वाहतूक व्यवस्था आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याचे आव्हान पोलिसांसमोर असते.

तिसऱ्यांदा अर्ज करण्यात आला असून यामध्ये ५० जणांना आंदोलन करण्याची परवानगी देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच सर्व नियम आणि अटींचे पालन केले जाईल, असे नमूद करण्यात आले आहे. १८ सप्टेंबर रोजी ठरवून दिलेल्या वेळेतच आंदोलन करण्यात येईल, असेही पत्रात स्पष्ट करण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मुंबईत आंदोलन करण्यावर जरांगे पाटील ठाम असल्याचे दिसून येत आहे.

### आम्ही गणपती पाहायला जाणार!'

पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारल्याने मराठा आंदोलकांनी आता एक नवा आणि लक्षवेधी पवित्रा घेतला आहे. 'आम्ही आमच्या सोयीनुसार मुंबईत गणपती पाहायला जाणार आहोत, आम्हाला गणेशोत्सव पाहण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. जेव्हा जरांगे पाटील बोलावतील, तेव्हा आम्ही सर्वजण आझाद मैदानात जमा होऊ,' अशी प्रतिक्रिया आंदोलकांनी दिली.

### परवानगी न मिळाल्यास न्यायालयाचा दरवाजा ठोठावणार?

मुंबई पोलिसांकडून आज दुपारपर्यंत आंदोलनाला परवानगी मिळाली नाही, तर मनोज जरांगे पाटील यांच्या वतीने न्यायालयात अर्ज दाखल केला जाण्याची शक्यता असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे आंदोलनाची परवानगी मिळवण्यासाठी आता कायदेशीर मार्गाचा अवलंब केला जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### हनुमानाचे दर्शन घेऊन जरांगे मुंबईच्या दिशेने रवाना

अंतरवाली सराटी येथील हनुमान मंदिरात दर्शन घेतल्यानंतर मनोज जरांगे पाटील मुंबईच्या दिशेने रवाना झाले. यावेळी महिलांनी त्यांचे औक्षण करून त्यांना निरोप दिला. मुंबईकूच सुरू करण्यापूर्वी माध्यमांशी संवाद साधताना जरांगे यांनी 'सगळ्यांनी मराठा समाजाला फसवलं आहे', असा आरोप केला. मराठा समाजाने एकजुटीने राहावे आणि आंदोलनादरम्यान शांतता राखावी, असे आवाहनही त्यांनी केले. तसेच आपण सरकारसमोर शरण जाणार नसल्याचा इशारा देत, समाजातील लेकरांच्या कल्याणासाठीच आपला लढा सुरू असल्याचे जरांगे यांनी सांगितले. त्यांच्या या भूमिकेमुळे मुंबईकूचकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

# ...अखेर घ्यावी लागली दखल!

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**अकोला :** कृषी विद्यापीठातील विविध घोटाळे आणि त्यावर विरोधात कुठलीही कारवाई न केल्याने कृषी परिषदेने गंभीर दखल घेत विद्यापीठाला खुलासा करण्याचे आदेश दिले आहे. इतकेच नाही तर मध्यवर्ती संशोधन केंद्रातील जमीन गैरवापर प्रकरणात अखेर खुलासा मागत कारवाईची तयारी सुरु झाल्याचे चित्र विद्यापीठात आहे.




### महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे कुलसचिवांना नोटीस

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषी महाविद्यालयातील कथित गैरव्यवहार, देयकांमधील अनियमितता आणि १३८ फाईल्स गहाळ झाल्याप्रकरणी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने गंभीर दखल घेतली आहे. परिषदेच्या सहसंचालक (प्रशासन) आरती भोसले यांनी पंदेकृविच्या कुलसचिवांना पत्र पाठवून वस्तुस्थितीदर्शक अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सिटी न्यूज सुपरफास्ट मध्ये 'पंदेकृविच्या कृषी महाविद्यालयात गैरव्यवहार: देयकांमध्ये अनियमितता, १३८ फाईल्स गहाळ, पोलिसांत तक्रार' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध झाले होते. या वृत्ताच्या आधारे शासनाने या प्रकरणाची चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने कृषी परिषदेने विद्यापीठाकडे वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागवला होता; मात्र तो अद्याप परिषदेला प्राप्त झालेला नाही. ११ सप्टेंबर २०२६ पर्यंत सादर करण्याचे अंतिम निर्देश दिले आहेत. या कारवाईमुळे विद्यापीठ प्रशासनात खळबळ उडाली आहे.

### कुलसचिवांकडून ३ दिवसांत स्पष्टीकरणाचे आदेश

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या (डॉ. पंदेकृवि) वणी रंभापूर येथील संशोधनाच्या जमिनीवर खासगी कंपनीचा वावर आणि वापर सुरू असल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर विद्यापीठ प्रशासनात खळबळ उडाली आहे. यासंदर्भात सिटी न्यूज सुपरफास्ट मध्ये आलेल्या वृत्ताची गंभीर दखल घेत कुलसचिव डॉ. प्रीती रोडगे यांनी संशोधन संचालकांना ३ दिवसांच्या आत सविस्तर खुलासा सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. संशोधनासाठी राखीव असलेल्या या जमिनीचा खासगी कंपनीकडून नेमका किती वापर केला जात आहे, याचा सविस्तर अहवाल मागवण्यात आला आहे. यात कंपनीकडे असलेली एकूण जमीन, सर्वे नंबर, प्रत्यक्ष वापरात असणारे क्षेत्र, ही जमीन कधीपासून वापरात आहे आणि या वापरासाठी रीतसर मंजुरी देण्यात आली आहे का, या सर्व बाबींचा खुलासा तातडीने सादर करण्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, अर्थशास्त्राच्या प्राध्यापकाने कांद्याचा ब्रीडर नसताना कसे काय उत्पादन घेतले हा ही संशोधनाचा विषय ठरला आहे. सिमेंट काँक्रीट प्लँट प्रकरणात मुख्य बिजोत्पादन अधिकारी मध्यवर्ती प्रात्यक्षिक क्षेत्र, वणी रंभापूर यांच्या विषयी विद्यापीठाच्या जमिनीच्या वापराबाबत प्रशासनाने दाखवलेल्या या कठोर भूमिकेमुळे कृषी वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे.

# नाशिकमध्ये निलंबन कारवाई; 800 तलाठी, ग्रामसेवक एकटवले!

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**नाशिक :** राज्यात गणेशोत्सवाची धूम आणि उत्साह पाहायला मिळत आहे. मात्र, दुसरीकडे मराठा आरक्षण आणि जात पडताळणी प्रमाणपत्राच्या मुद्यावरुन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईकडे कूच केली आहे. गणेशोत्सवामुळे पोलिसांनी मुंबईतील त्यांच्या आंदोलनाला परवानगी नाकारली आहे. तर, दुसरीकडे नाशिक जिल्ह्यात प्रांताधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराविरुद्ध तब्बल ८०० तलाठी आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांनी ठिय्या आंदोलन केले आहे. त्यामुळे, जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. प्रशासनातील काही अधिकाऱ्यांच्या कडक शिस्त आणि कठोर कामकाजाचा अनुभव कर्मचाऱ्यांना अनेकदा येत असतो. मात्र, कायम ग्रामस्थ आणि सर्वसामान्य नागरिकांच्या टीकेचे धनी बनणाऱ्या ग्रामविकास अधिकारी आणि तलाठी यांनाच एका खमक्या अधिकाऱ्याचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे, तलाठी आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांनी थेट आंदोलनाचा ठिय्या गाठला आहे. नाशिक जिल्ह्यातील प्रांत अधिकारी पवन दत्ता यांच्या मनमानी कारभाराविरोधात तलाठी महासंघ नाशिकमध्ये आक्रमक झाला आहे. इगतपुरी व त्रंबकेश्वर प्रांताधिकाऱ्यांचा मनमानी कारभार थांबवा, अन्यायकारक निलंबन व फेरा फेर कारवाईचा निषेध करत जिल्ह्यातील तलाठी एकवटल्याचं दिसून आलं. तसेच, निलंबित ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांचे बेकायदेशीर निलंबन व सक्तीच्या कारवाई मागे घ्याव्यात, यांसह इतर मागण्या मान्य कराव्या अशी मागणीही यावेळी तलाठी महोदयांनी केली.

आपल्या प्रशासकीय सेवेतील या विविध मागण्यांसाठी १५ तालुक्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांनी एकत्र येत आंदोलनात सहभाग नोंदवला.

# अमित शाह यांच्या 'त्या' वक्तव्यावरून महाराष्ट्रात संताप!

**ठाणे :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी 'महाराष्ट्र सारखे दुसरे बहुभाषिक राज्य संपूर्ण भारतात नाही' असे वक्तव्य केले होते. या वक्तव्याचे पडसाद आता महाराष्ट्रात उमटू लागलेले आहेत. मनसेनंतर आता मराठी एकीकरण समितीने देखील अमित शहा यांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त केला आहे. नवी मुंबई येथील सिडको प्रदर्शन केंद्रामध्ये हिंदी दिवस आणि हिंदी राजभाषा संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवारी या संमेलनात अमित शहा उपस्थित होते. शाह यांनी महाराष्ट्र हे बहुभाषिक राज्य असल्याचे वक्तव्य केला होतं. या वक्तव्यानंतर मराठी एकीकरण समितीकडून संताप व्यक्त होत आहे. शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राच्या मराठी राज्यावर हळूहळू हिंदीचा शिरकाव करण्याचा प्रयत्न करीत आहेत, असा आरोप गोवर्धन देशमुख यांनी केला.

# गजानन महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यासाठी भाविकांच्या गर्दीने दुमदुमली संतनगरी!



प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**शेगाव :** विदर्भाची पंढरी म्हणून ओळख असलेल्या शेगांवच्या श्री संत गजानन महाराजांचा आज ११६ वा पुण्यतिथी महोत्सव. शेगावात भाविकांची मोठी गर्दी उसळली आहे.

राज्यभरातून आज शेगावला लाखो भाविक दर्शनासाठी पोहचल्याने भक्तांची मांदियाळी दिसत आहे. जिल्ह्यातून नव्हे तर संपूर्ण राज्यभरातून दिंड्या हि या उत्साहात सहभागी झाल्या आहेत. भाविकांच्या सोयीसाठी मंदिर २४ तास खुले राहणार आहे. मागील ३ दिवसांपासून संस्थानच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रम घेतले जात आहेत. आज पुण्यतिथी उत्सव असल्याने सकाळपासूनच महाराजांवर श्रद्धा असणाऱ्या भाविकांनी शेगावात दर्शनासाठी अलोट गर्दी केली.त्यामुळे शेगाव शहर गर्दीने दुमदुमून गेलेय .. पुण्यतिथी उत्सव निमित्त पालखी सोहळा अनुभवण्यासाठी राज्यातून लाखांवर भाविक शेगावात दाखल झालेले आहेत.. भाविकांच्या गर्दीमुळे शेगाव नगरी दुमदुमून गेली असून भक्तीमय वातावरण पाहायला मिळते. गण गण गणात बोते असा गजर होत आहे.

# दिशा प्रकरण; 'एफआयआर'मध्ये आदित्य ठाकरेंचे नाव?



प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**मुंबई :** दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची माजी व्यवस्थापक दिशा सालियन हिच्या मृत्यू प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) सोमवारी या प्रकरणी प्राथमिक चौकशी अहवाल (एफआयआर) दाखल केला आहे. त्यात शिवसेनेचे (उबाठा) नेते आदित्य ठाकरे , अभिनेत्री रिया चक्रवर्ती, शोविक चक्रवर्ती यांच्यासह अनेक व्यक्तींची नावे आहेत. एफआयआरमध्ये नाव असणे म्हणजे, त्यांच्या भूमिकेची चौकशी होणे अपेक्षित आहे.

# शिवसेना पक्ष-चिन्हावर आज पुन्हा 'सर्वोच्च' सुनावणी!

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**मुंबई :** शिवसेना पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' निवडणूक चिन्ह कोणाचे, या महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत महत्त्वाच्या कायदेशीर लढाईवर आज, १५ सप्टेंबर २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयात पुन्हा सुनावणी होत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेला निवडणूक आयोगाने पक्षाचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह देण्याच्या निर्णयाला उद्धव ठाकरे गटाने आव्हान दिले आहे.

या याचिकेवरील सुनावणीदरम्यान आता शिंदे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांचा युक्तिवाद पुढे सुरू राहणार आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या १५ सप्टेंबरच्या सुनावणी सूचीमध्ये संबंधित प्रकरणांचा समावेश आहे. या प्रकरणात मागील सुनावणीदरम्यान कौल यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे जोरदार समर्थन केले होते. विशेषतः




निवडणूक चिन्ह आदेशातील परिच्छेद १५, पक्षाची घटना, पक्षांतर्गत लोकशाही आणि विधिमंडळातील बहुमत या मुद्यांवर त्यांनी शिंदे गटाची भूमिका मांडली. त्यामुळे आजचा युक्तिवाद नेमका कोणत्या दिशेने पुढे जातो, याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे. कौल यांनी राजकीय पक्षांच्या घटना लोकशाही पद्धतीच्या आहेत की नाहीत, याची पाहणी करण्याचा आयोगाला अधिकार असल्याचे सांगितले.

त्यामुळे आजच्या सुनावणीतही निवडणूक आयोगाने कोणत्या आधारावर धनुष्यबाण चिन्ह शिंदे गटाला दिले आणि त्या निर्णयाची न्यायालयीन कसोटी कशी तपासली जाणार, हा महत्त्वाचा मुद्दा राहण्याची शक्यता आहे.

# पुढील १५ दिवस पाऊस मारणार दडी!

**नागपूर :** राज्यभरात बळीराजा पावसाच्या प्रतिक्षेत आहे, अशातच शेतकऱ्यांची चिंता वाढवणारी बातमी समोर आली आहे, पुढची १५ दिवस विदर्भात मान्सूनच्या पावसाची कुठली शक्यता नसल्याने शेतकऱ्यांनी मान्सूनच्या पावसाची वाट न पाहता सिंचनाच्या पर्यायी उपयोजनेवर लक्ष केंद्रित करावे असा सल्ला नागपूर वेध शाळेने दिला आहे. बांगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला की विदर्भाला मान्सूनचा पाऊस मिळतो. मात्र सध्या पुढील काही दिवस बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याची कुठली शक्यता दिसत नसल्याची माहिती नागपूर वेध शाळेचे वैज्ञानीक प्रवीण कुमार यांनी दिली. सध्या अल निनोचा प्रभाव कायम असून सप्टेंबर महिन्यात देखील सरासरी पेक्षा कमी पावसाची नोंद होण्याची शक्यता आहे.






सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा २
मंगळवार, दि. १५ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# आधुनिक विश्वकर्मा सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या!

भारत देशात दरवर्षी १५ सप्टेंबर हा दिवस महान अभियंता सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जन्मदिनानिमित्त अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. भारताचे प्रसिद्ध अभियंता सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या स्मरणार्थ पाळला जातो.त्यांचा जन्म १५ सप्टेंबर १८६१ रोजी म्हैसूर (कर्नाटक) च्या कोलार जिल्ह्यात झाला. १९६८ मध्ये भारतात पहिल्यांदा हा दिवस साजरा करण्यात आला. सर विश्वेश्वरय्या यांनी अभियांत्रिकी आणि जलव्यवस्थापन क्षेत्रात मोलाचे कार्य केले. त्यांनी देशात अनेक धरणे, पूल आणि पाणीपुरवठा योजना बनवल्या. म्हैसूर राज्याच्या आधुनिकीकरणात त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या उत्कृष्ट कार्यासाठी भारत सरकारने त्यांना १९५५ मध्ये देशाचा सर्वोच्च भारतरत्न पुरस्कार दिला. देशाच्या विकासात आणि तंत्रज्ञानात अभियंत्यांचे योगदान किती मोठे आहे, हे हा दिवस आपल्याला सांगतो. वास्तविक, हा दिवस भारताचे महान अभियंता आणि भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांचा वाढदिवस आहे. ते भारतातील महान अभियंत्यांपैकी एक होते. त्यांनी आधुनिक भारताची निर्मिती केली आणि देशाला नवे रूप दिले. त्यांनी अभियांत्रिकी क्षेत्रात असाधारण योगदान दिले आहे, जे कोणीही विसरू शकत नाही. देशभरात बांधलेल्या अनेक नद्यांची धरणे आणि पूल यशस्वी करण्यात विश्वेश्वरय्या यांचा मोठा हात आहे. त्याच्यामुळे देशातील पाण्याचा प्रश्न सुटला.

सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांच्या स्मरणार्थ अभियंता दिन साजरा केला जातो. विश्वेश्वरैया यांचा जन्म कर्नाटकातील चिक्कबल्लापूर जिल्ह्यातील मुद्देनहळ्ळी नावाच्या एका छोट्या गावात झाला. त्यांचे वडील संस्कृतचे विद्वान होते आणि त्यांचे बालपण आर्थिक अडचणींनी भरलेले होते. त्यांनी चिक्कबल्लापूर आणि बंगळूरु येथे शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर, त्यांनी सेंट्रल कॉलेज, बंगळूरु येथून कला शाखेची पदवी प्राप्त केली. पुढे, त्यांनी कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग,




पुणे येथे स्थापत्य अभियांत्रिकीचे शिक्षण घेतले. त्यांनी बॉम्बे प्रेसिडेन्सीच्या सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरी मिळवली आणि तेथे त्यांनी आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली. विश्वेश्वरैया हे जलव्यवस्थापन आणि पूर नियंत्रण प्रणालीतील त्यांच्या कार्यासाठी ओळखले जातात. पुणे येथील खडकवासला जलाशयावर त्यांनी स्वयंचलित दरवाजे तयार केले, जे त्या काळातील एक महत्त्वाचे नवीन तंत्रज्ञान होते. हे दरवाजे नंतर भारतातील अनेक धरणांमध्ये बसवण्यात आले. अभियंता म्हणून डॉ. मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांनी देशात अनेक धरणे बांधली आहेत, ज्यात म्हैसूरमधील कृष्णराज सागर धरण, पुण्यातील खडकवासला जलाशय आणि ग्वाल्हेरमधील तिग्रा धरण यांचा समावेश आहे. एवढेच नाही तर हैदराबाद शहर बनवण्याचे संपूर्ण श्रेय डॉ. विश्वेश्वरय्या यांना जाते. त्यांनी तेथे पूर संरक्षण प्रणालीची रचना केली, त्यानंतर ते संपूर्ण भारतात प्रसिद्ध झाले. विशाखापट्टणम बंदराचे समुद्री कटाव होण्यापासून संरक्षण करण्यासाठी एक यंत्रणा विकसित करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. विश्वेश्वरय्या यांना आधुनिक म्हैसूर राज्याचे जनक असेही म्हटले गेले. त्यांनी म्हैसूर सरकारसोबत अनेक कारखाने आणि शैक्षणिक संस्था स्थापन केल्या होत्या, विशेषतः म्हैसूर साबण कारखाना, म्हैसूर लोह आणि स्टील कारखाना, स्टेट बँक ऑफ म्हैसूर, म्हैसूर चेंबर्स ऑफ कॉमर्स आणि विश्वेश्वरय्या अभियांत्रिकी महाविद्यालय.

### भारतासह अनेक देशांमध्ये साजरा केला जातो अभियंता दिन

अभियंता दिन केवळ भारतातच नव्हे तर इतर अनेक देशांमध्ये साजरा केला जातो. १६ जून रोजी अर्जेंटिनामध्ये, ७ मे रोजी बांगलादेशात, १५ जून रोजी इटलीमध्ये, ५ डिसेंबर रोजी तुर्कीमध्ये, २४ फेब्रुवारीला इराणमध्ये, २० मार्च रोजी बेल्जियममध्ये आणि १४ सप्टेंबर रोजी रोमानियामध्ये अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक, हा दिवस जगभरातील अभियंत्यांना प्रोत्साहित करण्यासाठी साजरा केला जातो, जेणेकरून ते त्यांच्या कौशल्यांमुळे देश आणि जगाला प्रगतीच्या नवीन मार्गावर नेतील. युनेस्कोने ४ मार्चला 'जागतिक अभियांत्रिकी दिवस' घोषित केला आहे. हा दिवस शाश्वत विकासाला समर्पित आहे.

# मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा प्रयत्न

## सरकारने मुख्य समस्या घेऊन येणाऱ्या बडग्यांच्या धारदार आवाजाला बोथट केले!

मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचे कार्य सरकारने केले याचे मनापासून स्वागत.परंतु या उत्सवाच्या दरम्यान राज्यातील वर्षभरातील राजकीय-सामाजिक समस्यां, उथलपुथल आणि इतर समस्यांच्या बाबतींत निघणारे बडगे नागपूरकरांसह संपूर्ण महाराष्ट्राचे आकर्षण रहायचे परंतु ते यावर्षी तसे काही दिसले नाही व चर्चेचा विषय सुध्दा बनले नाही त्यामुळे मारबत बढग्यांना घेऊन गेली की काय असे सर्वत्र चित्र दिसत होते.मारबत उत्सव हा नागपूरकरांनसाठी ऐतिहासिक आणि पारंपरिक उत्सव आहे.मारबत उत्सवाची सुरूवात स्वतंत्रपुर्व काळापासून म्हणजे इंग्रजांच्या काळात सुरू करण्यात आली. यामागचा मुख्य उद्देश म्हणजे लोकांना एकत्रित करून इंग्रजांविरूध्द मोठा लढा उभा करणे. कालांतराने हा उत्सव समाजातील वाईट चालीरितीचा व वाईट रूढींचा नाश आणि चांगल्या गोष्टींना प्रोत्साहन देणे हे या सणाचे उद्दीष्ट ठरले. येणारे विघ्न दुर करण्यासाठी १८८१ मध्ये काळ्या मारबतीची सुरूवात झाली.यानंतर १८८४मध्ये पिवळ्या मारबतीची सुरूवात झाली.आज काळ्या मारबतीला १४५ वर्षे पूर्ण झाले तर पिवळ्या मारबतीला १४२ वर्षे पूर्ण होत आहे हा एक इतिहास आहे.परंतु सरकारने मारबत उत्सव आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याच्या प्रयत्नात बडग्यांना महापालिकेने पायाखाली तुडविल्याचे दिसून आले.कारण यावर्षी मारबत उत्सवातदेश-विदेशातील प्रमुख पाहुणे मंडळी व राज्यातील राजकीय नेते प्रामुख्याने उपस्थित होते. यात परदेशी पाहुण्यांनमध्ये पॅट्रिक लेव्हेरीनो (फ्रान्सचे मुंबईतील कौन्सुल जनरल),मोनिका नागेलगार्ड(नॉर्वेचे मुंबईतील कौन्सुल जनरल),पेट्रा थेमन (फिनलंडच्या हेड ऑफ मिशन आणि कौन्सुल जनरल) आणि क्रीडा क्षेत्रातील उमेश यादव (भारतीय क्रिकेटपटू) व चित्रपट सृष्टीतील जॅकी श्रॉफ(प्रसिद्ध अभिनेते), अंकुश चौधरी,दिग्दर्शक सुभाष घई इत्यादी अनेक मान्यवरांसह अनेक मंत्री व राजकीय पुढारी प्रामुख्याने उपस्थित होते.त्यामुळे मारबत उत्सवात हीच मंडळी आकर्षण बनली व बडग्यांचे आकर्षण आपोआप कमी झाल्याचे दिसून आले.पुर्वी नागपूरमध्ये जेवढे काही बडगे निघायचे त्यांची गुंज (आवाज) संपूर्ण भारतभर जायची व सर्वत्र मोठ्या प्रमाणात चर्चा व्हायची. कारण यात जनसामान्यांच्या आवाज, समस्या व जनतेचा आक्रोश असलेल्या बडग्या व त्यांचा जल्लोष आणि सत्तेत असलेल्या सरकारला एक चांगला संदेश देऊन जागृत करणे बगडग्यांचे मुख्य उद्दिष्ट रहायचे परंतु यंदा समाज जागृतीची बढग्यांची धारदार तलवार मनपाने बोथट केली व बडग्यापासून मिळणारा जनसामान्यांचा संदेश व आनंद दुरावला.त्यामुळे असे वाटत आहे की, सरकारला समज देणारा बढग्यांचा आवाज सरकारने पुर्णतः दाबला की काय असे चित्र दिसून आले.कारण बडग्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या,दुष्काळ,पेपर फुटीच्या प्रकरणातील गुन्हेगार,रोडचे खड्डे, महिलांवरील अत्याचार, अशोक खरात सारखे प्रकरण, भ्रष्टाचार,घोटाळेबाज, टीईटी घोटाळा, महागाई, बेरोजगारी, एमपीएससी घोटाळा, आरक्षण, एआयमुळे बेरोजगारांवर आलेले संकट व वर्षभर घडलेल्या मुद्दांवर निघालेल्या घटनांवरील जाब विचारण्याची संधी बढग्यांनी गमावली की काय असे चित्र यावर्षी स्पष्ट दिसून आले. उलट पाकिस्तान, दहशतवाद आणि स्मार्ट मीटरविरोधापुरतेच राजकीय-सामाजिक भाष्य अधिक ठळक राहिले.त्यामुळे बडग्यांचा आवाज मनपाने मारबत उत्सवाच्या दरम्यान दाबला की काय असे वाटायला लागले.त्याचप्रमाणे महापालिकेने मारबत उत्सव ग्लोबल करण्यासाठी आणलेल्या व्हिआयपी झगमगाटामुळे बडग्यांचा धारदार आवाज बोथड केला. यावर्षी नागपूरची परंपरा व्हिआयपी झगमगाटात पुर्णपणे हरवली की, काय असे चित्र दिसून आले.मारबत नेहमीप्रमाणे निघाली आणि घेऊन जा गे मारबतच्या आवाजाचा गजरही सर्वत्र झाला,परंतु सत्तेने सरकारला जाब विचारणाऱ्या बढग्यांना धाराशाही करून त्यांचा आवाज बोथट केला. त्यामुळे नागपूरकरांना शंका आहे की, बढग्यांना मारबत घेऊन गेली की काय! असे वाटायला लागले. मारबत उत्सवाच्या निमित्ताने राज्यातील जनतेच्या समस्या, अडीअडचणी, बेरोजगारीची समस्या, पेपर फुटीमुळे विद्यार्थ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या समस्या,एमपीएससी पेपर फुटी प्रकरण इत्यादी अनेक समस्यांचा अंबार सरकारपर्यंत पोहचविण्याचे काम बढग्यांच्या माध्यमातून नेहमीच होत होते आणि याची चर्चा नागपूरपासून राज्यभर आणि राज्यापासून देशभर रहात होती.परंतु या सर्व समस्या राजकीय पुढारी व व्हिआपी लोकांनी संपुष्टात आणल्याचे दिसून आले.नागपूर मारबत उत्सवात बडग्यांचा जल्लोष किंवा आवाज नाही म्हणजे राज्यात काहीच समस्या नसून सर्व काही ठीक आहे अशा पध्दतीचा मारबत उत्सव यावर्षी दिसून आला. त्याचप्रमाणे यावर्षी राजकीय-सामाजिक प्रश्नांवरचा आवाज क्षीण झाल्याचे दिसून आले. मारबत-बडग्याचा हा सोहळा इंग्रजांच्या सत्तेला आव्हान देत सुरू झाला.तेव्हापासुन अन्याय, भ्रष्टाचार, अत्याचार, आणि सरकारच्या चुकीच्या धोरणाविरोधात बढग्यांनी नेहमी आवाज उठविला आहे.परंतू यंदा मात्र वर्षभर गाजलेल्या अनेक राजकीय-सामाजिक प्रश्नांवर अपेक्षित उपरोध दिसला नाही. त्यामुळे घेऊन जा गे मारबतचा गजर झाला खरा, पण बडग्यातून सत्तेला जाब विचारणारा आवाज यावर्षी मात्र क्षीण राहिला हे दुर्भाग्य म्हणावे लागेल.



रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो. नं. ९९२१६९०७७९
नागपूर.

# ऋषीपंचमी विशेष : ऋषी महर्षी वाल्मिकींच्या ज्ञानदीपाला वंदन; ऋषी घूसरकर महाराजांच्या स्मृतींना भावपूर्ण अभिवादन

भारतीय अध्यात्मविश्वात महर्षी वाल्मिकी यांचे स्थान अद्वितीय आहे. प्रभू श्रीरामांच्या जन्मापूर्वीच महर्षी वाल्मिकींनी रामायणाची रचना केली, त्यांच्या या महान रामायण काव्यातील प्रत्येक प्रसंग, घटना त्या पुढे तंतोतंत सत्य, खऱ्या ठरल्या, आपण वाल्मिकी रामायण टीव्ही मालिकेचे द्वारे पाहिले आहे.त्यातील प्रसंग विचार आणि जीवनमूल्य आजही मानवाला सत्य, धर्म आणि कर्तव्याचा मार्ग दाखवतात. रामायण हा केवळ एक ग्रंथ नाही, तर सत्य, धर्म, कर्तव्य, त्याग, प्रेम, मर्यादा आणि आदर्श जीवनमूल्यांचा अखंड ज्ञानदीप आहे. हीच महर्षी वाल्मिकींची अमूल्य आध्यात्मिक काव्यसंपदा आहे.याच महान ऋषी महर्षी वाल्मिकींच्या नावाने असलेला पुरातन मठ अमरावती जिल्ह्यातील सामदा काशीपूर येथे आहे. या पवित्र महर्षी वाल्मिकी मठाला शासनाचा 'ब वर्ग तीर्थक्षेत्र' दर्जा प्राप्त आहे. या मठ संस्थानचे २९ वे दिवंगत मठाधिपती ऋषी घूसरकर महाराज होते. त्यांच्या पवित्र सहवासात राहण्याचा योग मला, उमेश ढोणे, सद्गुरूचा दास म्हणून लाभला, हे माझे मोठे आध्यात्मिक सौभाग्य मी मानतो.

ऋषी घूसरकर महाराजांनी आपल्या संपूर्ण जीवनात कीर्तन, प्रवचन आणि समाजप्रबोधनाच्या माध्यमातून अध्यात्माचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविला. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र शासनाने त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित केले होते. त्यांच्या सहवासातून भक्तीबरोबरच विवेक, संयम, सदाचार आणि मानवसेवेची प्रेरणा मिळाली. त्यांचे जीवन म्हणजे अध्यात्म, समाजसेवा आणि संस्कारांचा त्रिवेणी संगम होते.

भारतीय संस्कृतीच्या महान परंपरेत ऋषी-



मुनींना ज्ञान, तपस्या, संयम, संस्कार आणि अध्यात्माचे सर्वोच्च स्थान आहे. भाद्रपद शुक्ल पंचमी, म्हणजेच ऋषीपंचमी, आपल्या जीवनाला दिशा देणाऱ्या ऋषींचे स्मरण करून त्यांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करण्याचा पवित्र दिवस आहे.

ऋषीपंचमीच्या निमित्ताने केवळ ऋषींचे स्मरण करून त्यांच्या विचारांना आपल्या आचरणात स्थान देणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. ज्ञानाचा प्रकाश, सत्याचा मार्ग, संस्कारांची शिदोरी आणि मानवतेची सेवा या मूल्यांचा स्वीकार करण्याचा संकल्प करूया.

ऋषींच्या ज्ञानाचा प्रकाश आपल्या जीवनात सदैव तेवत राहो आणि समाजात भक्ती, संस्कार, विवेक व मानवतेची ज्योत अखंड प्रज्वलित राहो, हीच ऋषीपंचमीच्या पावन पर्वानिमित्त मी उमेश ढोणे सद्गुरुचा दास म्हणून प्रार्थना करतो. व दिवंगत ऋषी महर्षि वाल्मिकी मठाचे २९ वे मठाधिपती ऋषी घुसरकर महाराज यांचे स्मरण करून वंदन करतो. जय गुरुदेव.

### ऋषी पंचमीचे महात्म्य!

कश्यप, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नी, वसिष्ठ आणि अत्रि या सात ऋषींची प्रत्येकी एक आणि वसिष्ठांची पत्नी अरुंधतीची एक अशा एकूण आठ सुपाऱ्या मांडून ही पूजा सिद्ध केली जाते. ब्रह्मदेवाचे मानसपुत्र पुलस्त्य, क्रतु, पुलस्त्य, मरीचि, अत्रि आणि वसिष्ठ या ऋषींचे पूजनही या दिवशी केले जाते. या दिवशी बैलाच्या कष्टाचे कोणतेही अन्न खाल्ले जात नाही. वर्षातून किमान एक दिवस तरी स्वतःच्याच कष्टाचे अन्न खावे, हा यामागचा संकेत वा संदेश आहे. अशा रितीने 'स्वकष्टार्जित' या शब्दाला ऋषींनी प्रतिष्ठा दिलेली आहे. आपल्या जीवनाच्या सर्वांगीण विकासासाठी ऋषींनी सांगितलेल्या ज्ञान सिद्धान्ताचे वाचन, चिंतन, मनन पुढच्या पिढीने करत राहावे, याची आठवण देण्यासाठी हे व्रत आहे असे मानले जाते. गृहस्थाश्रमी पुरुषांच्या बाबतीत या व्रताची मुख्य योजना मुख्यत: आचार प्रणालींची ओळख व्हावी व गृहस्थाश्रम हा त्यांच्याप्रमाणेच आचारसंपन्न व्हावा या हेतूने असतो. स्त्रियांनी रजोनिवृत्तीनंतर हे व्रत अशा प्रकारे केल्यास त्यांच्याकडून पूर्वी रजोदर्शन काळात घडलेल्या स्पर्शात्मक दोषांचे मानसिक पातळीवर निरसन होऊ शकते असे मानले जाते. ज्या विद्यार्थ्यांना श्रावणी (वेदाध्ययन करणाऱ्या वर्गासाठी विहित व्रत) संस्काराचा लाभ होत नाही अशा सर्ववर्णीय स्त्री पुरुषांनी त्यांच्या नित्य कर्मातील त्रुटी व स्खलन यांच्या परिहारासाठी ऋषिपंचमी हे व्रत करावे, असे सांगितले आहे.

उमेश महादेवराव ढोणे
सद्गुरूचा दास -मोब.९०४९०६७३३१,

१४ सप्टेंबर १९४९ रोजी घटना समितीने भारतीय संघराज्याच्या राजभाषेत ऐतिहासिक निर्णय घेऊन हिंदी भाषेला राजभाषेचा सन्मान दिला. त्यामुळे दरवर्षी १४ सप्टेंबर हा दिवस 'हिंदी दिन' म्हणून साजरा केला जातो. राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये सध्या बावीस भाषांना राष्ट्रभाषा म्हणून दर्जा देण्यात आला आहे. भारतीय राज्यघटनेच्या १७ व्या भागात परिच्छेद ३४३ पासून ३५१ पर्यंत जी कलमे नमूद आहेत, त्यानुसार हिंदी ही भारतीय संघराज्याची राजभाषा असून, तिची लिपी देवनागरी असल्याचा स्पष्ट उल्लेख आहे.

१९१८ मध्ये गांधीजींनी हिंदी साहित्य संमेलनात हिंदीला राजभाषा बनवण्याची मागणी केली होती. गांधीजींनी तिला जनमानसाची भाषाही म्हणले आहे. सन १९४९ मध्ये, स्वतंत्र भारताच्या अधिकृत भाषेच्या प्रश्नावर बराच विचारविनिमय केल्यानंतर, १४ सप्टेंबर १९४९ रोजी हा निर्णय घेण्यात आला, ज्याचे भारतीय राज्यघटनेच्या १७ व्या अध्यायातील कलम ३४३ (१) मध्ये खालीलप्रमाणे वर्णन केले आहे. संघाची अधिकृत भाषा हिंदी आणि लिपी देवनागरी असेल. संघाच्या अधिकृत हेतूंसाठी वापरल्या जाणाऱ्या अंकांचे स्वरूप आंतरराष्ट्रीय स्वरूप असेल. हा निर्णय 14 सप्टेंबर रोजी घेण्यात आला, हा दिवस हिंदी साहित्यिक व्योहर राजेंद्र सिंह यांचा 50 वा वाढदिवस होता, म्हणूनच हा दिवस हिंदी दिवसासाठी सर्वोत्तम मानला जात होता. मात्र, राष्ट्रभाषा म्हणून तिची निवड करून अमलात आणल्यावर अहिंदी भाषिक राज्यातील लोकांनी विरोध सुरू केला आणि इंग्रजीलाही राजभाषेचा दर्जा द्यावा लागला. त्यामुळे हिंदीवरही इंग्रजी भाषेचा प्रभाव पडू लागला.

हिंदी दिवसात अनेक कार्यक्रम होतात. या दिवशी विद्यार्थ्यांना हिंदीचा आदर करण्यास आणि दैनंदिन व्यवहारात हिंदीचा वापर करण्यास शिकवले जाते. ज्यामध्ये हिंदी निबंध लेखन, वादविवाद, हिंदी टायपिंग स्पर्धा इ. हिंदी दिनानिमित्त लोकांना हिंदीसाठी प्रेरित करण्यासाठी भाषा सन्मान सुरू करण्यात आला आहे. हिंदी भाषेचा लोकांमध्ये वापर आणि उन्नतीसाठी विशेष योगदान देणाऱ्या देशातील अशा व्यक्तिमत्त्वाला दरवर्षी हा सन्मान देण्यात येणार आहे. यासाठी एक लाख एक हजार रुपये मानधन म्हणून दिले जाते. हिंदी भाषेतील निबंध लेखन स्पर्धेच्या माध्यमातून अनेक ठिकाणी हिंदी भाषेच्या विकासासाठी आणि विस्तारासाठी अनेक सूचनाही प्राप्त होत आहेत. पण दुसऱ्या दिवशी सर्वजण हिंदी भाषा विसरतात. आणखी काही दिवस हिंदी भाषा लक्षात ठेवा, यासाठी राष्ट्रीय भाषा सप्ताहही आयोजित करण्यात आला आहे. त्यामुळे ते वर्षातून किमान आठवडाभर राहते.

भाषिकांच्या संख्येनुसार, इंग्रजी आणि चिनी भाषांनंतर हिंदी ही जगातील तिसरी मोठी भाषा आहे. पण नीट समजणाऱ्या, वाचणाऱ्या आणि लिहिणाऱ्यांमध्ये ही संख्या फार कमी आहे. तो कमी होत चालला आहे. यासोबतच इंग्रजी शब्दांचाही हिंदी भाषेवर मोठा प्रभाव पडला असून अनेक शब्द प्रचलित होऊन त्यांची जागा इंग्रजी शब्दांनी घेतली आहे. त्यामुळे भविष्यात ही भाषा नामशेष होण्याची शक्यताही वाढली आहे.




या कारणास्तव, ज्यांना हिंदीचे ज्ञान आहे किंवा हिंदी भाषा जाणते, अशा लोकांना त्यांच्या हिंदीबद्दलच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी हा दिवस हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो, जेणेकरून ते सर्व त्यांचे कर्तव्य पार पाडू शकतील आणि हिंदी भाषेचे भविष्य घडवू शकतील. ते विलुप्त होण्यापासून वाचवा. मात्र जनता आणि सरकार दोघेही याबाबत उदासीन दिसतात. हिंदी तिच्याच घरात दासी म्हणून राहते. हिंदी ही अद्याप संयुक्त राष्ट्रांची भाषा बनलेली नाही. योगाला १७७ देशांचा पाठिंबा मिळाला असे म्हणणे उपरोधिक ठरेल, पण १२९ देशांमध्ये हिंदीसाठी काय जमवता येत नाही? त्याची अशी अवस्था झाली आहे की, हिंदी दिवसाच्या दिवशीही ट्विटरवर अनेकांना हिंदीत बोला असे शब्द वापरावे लागत आहेत. अमर उजालाने लोकांना किमान हिंदी दिवसाच्या दिवशी तरी हिंदीत ट्वीट करण्याची विनंती केली आहे. वर्षातून एकदा लोकांना जाणीव करून देणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे की जोपर्यंत ते हिंदीचा पूर्ण वापर करत नाहीत तोपर्यंत हिंदी भाषेचा विकास होऊ शकत नाही. या दिवशी सर्व सरकारी कार्यालयांमध्ये इंग्रजीऐवजी हिंदीचा वापर करण्याचा सल्ला दिला जातो. याशिवाय जो वर्षभर हिंदीत चांगली विकासकामे करतो आणि आपल्या कामात हिंदीचा चांगला वापर करतो, त्याला पुरस्काराने गौरविण्यात येते.

बरेच लोक त्यांच्या सामान्य बोलण्यात इंग्लिश भाषेतील शब्द किंवा इंग्रजी देखील वापरतात, ज्यामुळे हिंदीचे अस्तित्व हळूहळू धोक्यात येत आहे. दूरचित्रवाणीपासून शाळांपर्यंत आणि सोशल मीडियापासून खाजगी तांत्रिक संस्था आणि खाजगी कार्यालयांपर्यंत सर्वच गोष्टींवर इंग्रजीचे वर्चस्व कायम आहे. यावरून असे दिसते की त्यांची मातृभाषा हिंदी हळूहळू कमी व्हावी आणि नंतर दशकांनंतर नामशेष होऊ नये. आपल्या मातृभाषेला आपल्या जीवनात लहानसहान प्रयत्नांनी आवश्यक स्थान दिले नाही तर ती इतर भाषांच्या स्पर्धेत खूप मागे पडेल. वाराणसी येथे असलेली जगातील सर्वात मोठी हिंदी संस्थाही आज अतिशय जीर्ण अवस्थेत आहे. या कारणास्तव, या दिवशी सर्वांना विनंती आहे की त्यांनी फक्त त्यांच्या बोलल्या जाणाऱ्या भाषेत हिंदीचा वापर करावा. याशिवाय लोकांना त्यांचे विचार वगैरे हिंदीत लिहिण्यास सांगितले जाते. हिंदी भाषेत लिहिण्याची साधने फार कमी लोकांना माहिती असल्याने या दिवशी हिंदी भाषेतील लेखन, तपासणे आणि शब्दकोश याबद्दल माहिती दिली जाते. हिंदी भाषेच्या विकासासाठी काही लोकांनी काम केल्याने फारसा फायदा होणार नाही. त्यासाठी सर्वांना संघटित होऊन हिंदीच्या विकासाला एका नव्या वळणावर घेऊन जावे लागेल. हिंदी भाषेच्या विकासासाठी आणि ती नष्ट होण्यापासून वाचवण्यासाठी हे आवश्यक आहे.

१४ सप्टेंबरपासून एक आठवडा हिंदी सप्ताह साजरा केला जातो. या आठवड्यात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शाळेत आणि कार्यालयात आयोजित केला जातो. केवळ हिंदी दिवसापुरते मर्यादित न राहता लोकांमध्ये हिंदी भाषेच्या विकासाची भावना वाढवणे हा त्याचा मूळ उद्देश आहे. या सात दिवसांत हिंदी भाषेचा विकास आणि निबंध वगैरे लिहून न केल्यास त्याचे फायदे-तोटे समजावून सांगितले जातात.

लोकांना हिंदीबद्दल प्रोत्साहन देण्यासाठी हिंदी दिवसानिमित्त पुरस्कार सोहळ्याचे आयोजनही केले जाते. ज्यामध्ये कामाच्या दरम्यान चांगली हिंदी वापरणाऱ्या व्यक्तीला हा पुरस्कार दिला जातो. हे पूर्वी राजकारण्यांच्या नावावर होते, जे नंतर राष्ट्रभाषा कीर्ती पुरस्कार आणि राष्ट्रभाषा गौरव पुरस्कार असे बदलले गेले. राष्ट्रभाषा गौरव पुरस्कार लोकांना दिला जातो तर राष्ट्रभाषा कीर्ती पुरस्कार कोणत्याही विभाग, समिती इत्यादींना दिला जातो.

तांत्रिक किंवा विज्ञान या विषयावर लेखन करणाऱ्या कोणत्याही भारतीय नागरिकाला हा पुरस्कार दिला जातो. दहा हजार ते दोन लाख रुपयांपर्यंतची 13 बक्षिसे आहेत. यामध्ये प्रथम पारितोषिक विजेत्यास 2 लाख रुपये, द्वितीय पारितोषिक विजेत्यास 1.5 लाख रुपये आणि तृतीय पारितोषिक विजेत्यास पंचाहत्तर हजार रुपयांचे बक्षीस देण्यात आले आहे. यासोबतच दहा जणांना प्रत्येकी दहा हजार रुपये प्रोत्साहनपर बक्षीस म्हणून दिले जाते. सर्व पुरस्कार विजेत्यांना स्मृतीचिन्ह देखील देण्यात आले. तंत्रज्ञान आणि विज्ञान क्षेत्रात हिंदी भाषा प्रगत करणे हा त्याचा मूळ उद्देश आहे.

या पुरस्कार योजनेंतर्गत एकूण 39 पुरस्कार दिले जातात. हा पुरस्कार कोणत्याही समिती, विभाग, मंडळ इत्यादींनी हिंदीत केलेल्या उत्कृष्ट कार्यासाठी दिला जातो. सरकारी कामात हिंदी भाषेचा वापर करणे हा त्याचा मूळ उद्देश आहे.

अनेक हिंदी लेखक आणि हिंदी भाषा जाणकार सांगतात की, हिंदी दिवस हा सरकारी कामासारखाच आहे, जो केवळ एक दिवस साजरा केला जातो. यामुळे हिंदी भाषेचा विकास होत नाही, उलट हिंदी भाषेचे नुकसान होते. हिंदी दिनाच्या सोहळ्यातही अनेकजण इंग्लिश भाषेत लिहून लोकांचे स्वागत करतात. सरकार हिंदी भाषेच्या विकासासाठी काम करत आहे हे दाखवण्यासाठीच ते चालवते. खुद्द सरकारी कर्मचारीही हिंदीऐवजी इंग्रजीत काम करताना दिसतात. पण काही लोकांचे मत आहे की, विविध कारणे सांगून हिंदी दिनाला विरोध करणाऱ्या आणि खिल्ली उडवणाऱ्यांना हिंदीबद्दलची आपुलकीची भावनाही संपुष्टात आली पाहिजे, असे वाटते.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
मंगळवार, दि.१५ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


## शहरात रात्री उशिरापर्यंत गणेश स्थापना

**अकोला:** गणेश चतुर्थीला सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून रात्री उशिरापर्यंत गणेश मूर्ती स्थापन करण्यात आल्या. विधीवत पूजा करून बाप्पाला विराजमान करण्यात आले. प्रसाद वाटप तसेच फटाक्यांची आतिषबाजी झाली. वाजत गाजत बाप्पाला मंडपात आणले. मंडळाचे कार्यकर्ते अतिशय उत्साही होते.

## आधी वंदू तुज मोरया...


**ईशा विजय बुंदेले,** अंबिका नगर मलकापूर,अकोला


**धर्मेंद्र मोयल,** तुकाराम चौक मलकापूर,अकोला


वक्रतुंड गणेश उत्सव मंडळ, चक्रधर कॉलनी गुड

# आता गौरीच्या आगमनाचे लागले वेध

## सजल्या बाजारपेठा; दागिने, साड्या अन् आकर्षक वस्तूंच्या खरेदीसाठी महिलांची लगबग

प्रतिनिधी १५ सप्टेंबर





**अकोला:** सोमवारी श्री गणपती बाप्पाचे सर्वत्र थाटात आगमन झाल्यानंतर आता माता गौरी अर्थात महालक्ष्मीच्या आगमनाची चाहूल लागल्याने अकोला शहर आणि परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, घराघरांत बाप्पांसोबतच माता गौरीच्या स्वागताची जोरदार तयारी सुरू झाली आहे. गणरायाच्या आगमनासोबतच महिलावर्गालाही गौरी आगमनाचे वेध लागले असून, गौराईच्या स्वागतासाठी आवश्यक विविध साहित्याच्या खरेदीसाठी शहरांतील बाजारपेठांमध्ये महिलांची लगबग वाढू लागली आहे.

बाजारपेठांतील दुकाने सध्या रंगीबेरंगी सजावटीचे साहित्य, आकर्षक साड्या, दागिने आणि पारंपरिक वस्तूंनी सजली आहेत. गौरीच्या, सजावटीसाठी आवश्यक असलेल्या विविध प्रकारच्या वस्तू मोठ्या प्रमाणात बाजारात। दाखल झाल्या असून, महिलांकडून त्यांच्या खरेदीला पसंती मिळत आहे

### बाजारपेठांमध्ये सध्या सणोत्सवाचे नवचैतन्य

यंदा पारंपरिक साहित्याबरोबरच आधुनिक आणि आकर्षक सजावटीच्या वस्तूंनाही महिलांकडून पसंती मिळत आहे. गौरी-गणपतीच्या पार्श्वभूमीवर घराच्या सजावटीसाठीही विविध वस्तूंची खरेदी केली जात आहे. साडी, दागिने, पूजेचे साहित्य, फुलांची सजावट तसेच घर सजविण्यासाठी आवश्यक वस्तू खरेदी करण्यासाठी नागरिक बाजारपेठांकडे वळू लागले आहेत. विशेषतः सायंकाळच्या वेळेत महिलांसह कुटुंबे मोठ्या संख्येने खरेदीसाठी बाजारात दाखल होत आहेत. त्यामुळे बाजारपेठांमध्ये सध्या सणोत्सवाचे चैतन्य आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### आकर्षक मखर व अन्य सजावटीच्या वस्तूही बाजारात

सुंदर हार, बं।गड्या, मंगळसूत्र, नथ, कानातील दागिने यांसह विविध अलंकार महिलांचे लक्ष वेधून घेत आहेत, त्याचबरोबर गौराईच्या सजावटीसाठी लागणारे विविध रंगांचे कापड, फुले, आकर्षक मखर आणि अन्य सजावटीच्या वस्तूही बाजारात उपलब्ध झाल्या आहेत. काही दुकानदारांनी आकर्षक पद्धतीने सजविलेल्या गौराई मांडल्या असून, त्या पाहण्यासाठीही नागरिकांची गर्दी होत आहे. पारंपरिक पद्धतीने गौरीचे स्वागत करण्यासाठी महिला वगनि आतापासूनच नियोजन सुरू केले आहे. गौराईला सुंदर साडी नेसविण्यापासून ते विविध दागिन्यांनी सजविण्यापर्यंत प्रत्येक गोष्टीची विशेष काळजी घेतली जात आहे.

### महिलांकडून गौराईच्या स्वागतासाठी विशेष तयारी

गणपती बाप्पाच्या आगमनानंतर गौरीपूजनाचा सोहळाही मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. त्यामुळे घरातील महिलांकडून गौराईच्या स्वागतासाठी विशेष तयारी केली जात आहे. दुकानदारांनीही गणेशोत्सव आणि गौरीपूजनाच्या पार्श्वभूमीवर विविध प्रकारचे साहित्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून ठेवले आहे.

## विभोर देशमुखची राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड

प्रतिनिधी १५ सप्टेंबर



**अकोला :** कोल्हापूर येथे झालेल्या सीबीएसई साऊथ झोन-२ बॉक्सिंग स्पर्धेत प्रभात किड्स स्कूलच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. विभोर भानुदास देशमुख याने १४ वर्षे वयोगटातील ४८ ते ५० किलो वजनगटात प्रथम क्रमांक पटकावत सुवर्णपदक मिळविले. या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर त्याची हरियाणा येथे होणाऱ्या सीबीएसई राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. दरम्यान, मानस अहिर याने ३० ते ३२ किलो वजनगटात तृतीय क्रमांक मिळवत कांस्यपदक पटकाविले. विभोर हा करडा (ता. रिसोड) येथील मूळ रहिवासी आहे.

संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूल, कोल्हापूर येथे २६ ते ३० ऑगस्टदरम्यान सीबीएसई साऊथ झोन-२ बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध शाळांतील खेळाडूंनी सहभाग घेतला. त्यात प्रभात किड्स स्कूलच्या विभोर देशमुखने आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत ४८ ते ५० किलो वजनगटात अव्वल स्थान मिळविले. त्याचबरोबर मानस अहिरनेही उल्लेखनीय कामगिरी करत कांस्यपदकावर नाव कोरले. साऊथ झोन-२ स्पर्धेतील सुवर्णपदकाच्या कामगिरीमुळे विभोर देशमुखची हरियाणा येथे होणाऱ्या सीबीएसई राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यामुळे जिल्ह्याचे तसेच प्रभात किड्स स्कूलचे नाव राष्ट्रीय स्तरावर झळकणार आहे. या खेळाडूंना प्रभातचे क्रीडा प्रशिक्षक राहुल वानखडे व रिया ताराम यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूंनी केलेल्या या यशाबद्दल शाळा परिवारातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## बाल शिवाजी शाळेत हजार विद्यार्थ्यांकडून अथर्वशीर्षाचे पंच सहस्त्रावर्तन

प्रतिनिधी १५ सप्टेंबर





**अकोला:** ब्राह्मण सभा अंतर्गत संचालित बाल शिवाजी शाळेत गणेशोत्सवाचे औचित्य साधून अथर्वशीर्षाचे पंच सहस्त्रावर्तन अत्यंत भक्तिमय आणि उत्साही वातावरणात पार पडले. मंगळवार, १५ सप्टेंबर २०२६ रोजी पार पडलेल्या या सोहळ्यात भक्ती आणि संस्कारांचा अनोखा संगम उपस्थितांना अनुभवायला मिळाला.

गणपती बाप्पा हे बुद्धीचे आराध्य दैवत मानले जाते. त्या बुद्धिदात्या गणेशाकडे आपण नेहमी मांगल्याची मागणी करत असतो. तो आपले रक्षण करतो तसेच भूत, वर्तमान आणि भविष्य या तिन्ही काळांच्या पलीकडे आहे. तो मूलाधार चक्रात वास करतो. आयुष्यात कितीही संकटे आली तरी चित्तवृत्तीचे संतुलन राखण्यास अथर्वशीर्षाचे पठण अत्यंत मदत करते. श्री अथर्वशीर्षाचे पठण करताना जणू काही आपण गुरुकुल आश्रमात जाऊन वेदाध्ययन करत असल्याचा अनुपम आनंद आणि समाधान मिळते. याच धार्मिक हेतूने दरवर्षी शाळेत अथर्वशीर्षाचे सामूहिक पठण आयोजित केले जाते.

या वर्षीदेखील १,००० विद्यार्थ्यांनी शिस्तबद्ध रीतीने पंच सहस्त्र वेळा केलेले अथर्वशीर्षाचे पठण हे या कार्यक्रमाचे मुख्य आणि विशेष आकर्षण ठरले. आपल्या लाडक्या गणपती बाप्पासाठी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने आणि शिस्तीने सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेशाच्या पूजनाने झाली. याप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष नरेंद्र पाठक, सचिव मोहन गद्रे, कार्यकारी सदस्य वैजयंती पाठक, शाळेच्या मुख्याध्यापिका संगिता जळमकर, कीर्ती चोपडे, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक वर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी गणेश पूजा करून कार्यक्रमाची सुरुवात केली.पूजनानंतर सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मिळून अथर्वशीर्षाचे सामूहिक पठण केले. पंच सहस्त्रावर्तन स्तोत्रपठण संपन्न झाल्यानंतर उपस्थितांच्या हस्ते गणपतीची भव्य आरती करण्यात आली. त्यानंतर मंत्रपुष्पांजलीने संपूर्ण कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. आरतीनंतर 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने संपूर्ण शाळा परिसर दुमदुमून गेला आणि वातावरण अत्यंत भक्तिमय झाले. कार्यक्रमाचे अतिशय उत्कृष्ट व सूत्रबद्ध सूत्रसंचालन शिक्षिका शुभांगी तिडके यांनी केले.

## विजेच्या लपंडाव थांबवा

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**अकोला:** सण-उत्सवाचा काळ असतानाही नागरिकांना विजेच्या लपंडावाचा त्रास सहन करावा लागत आहे. थोडा जरी पाऊस आला तरी वीज पुरवठा खंडित करण्यात येत असल्याने नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. ही समस्या लहान उमरी परिसरात वारंवार उद्भवत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. दोन दिवसापूर्वी रात्री १ वाजतापासून वीज गुल झाली ती रात्री ३ वाजता आल्याने ती रात्र नागरिकांना जागून काढावी लागली. यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी या भागातील नागरिकांकडून होत आहे. या प्रकाराला आळा घालण्याची मागणी आहे.

## दुष्काळसदृश्य परिस्थितीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी

### पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांची ग्वाही

प्रतिनिधी १५ सप्टेंबर



**अकोला :** पावसातील खंड आणि कमी पावसामुळे जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीची शासन स्तरावर दखल घेण्यात आली असून, शेतकरी बांधवांना परिपूर्ण मदत मिळवून देण्यात येईल. एकही नुकसानबाधित शेतकरी बांधव वंचित राहणार नाही, अशी ग्वाही राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिली आहे. जिल्ह्यातील कमी पाऊस व पीक स्थिती जाणून मदतीच्या अनुषंगाने शासन स्तरावर हालचाली सुरू आहेत. त्याबाबत मंत्री मंडळ स्तरावरही चर्चा झाली आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे पालकमंत्र्यांनी सांगितले. जिल्ह्यातील सर्व पिकांची सद्यस्थिती, पेरणीची वेळ, शेवटचा झालेला पाऊस, पावसातील खंड, जमिनीतील ओलावा तसेच पिकांना उपलब्ध असलेले पाणी या सर्व बाबींचा विचार करून, त्याचप्रमाणे, गावांमधील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांसाठी चारा व पाण्याची स्थिती याचीही नोंद लक्षात घेऊन मदतीच्या अनुषंगाने लवकरच कार्यवाही होणार आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन आवश्यक त्या उपाययोजना तातडीने करण्यात येतील. एकही नुकसानबाधित शेतकरी वंचित राहणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्र्यांनी दिली आहे.

## एमआयडीसीतील तूरडाळ चोरीप्रकरणी सहा आरोपी अटकेत

प्रतिनिधी १५ सप्टेंबर



**अकोला:** एमआयडीसी क्रमांक चार परिसरातील ॲग्रोवेअर, गोडाऊन क्रमांक २ येथील हाऊसिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या गोडाऊनमधून तब्बल ६९ कट्टे तूरडाळ चोरीला गेल्याच्या प्रकरणाचा सनी एमआयडीसी पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली असून चोरीस गेलेला तूरडाळीचा माल ताब्यात घेतला आहे. गोडाऊनमधून प्रत्येकी ६० किलो वजनाचे ६९ कट्टे चोरीला गेले होते. चोरी झालेल्या तूरडाळीचे एकूण वजन सुमारे ४१.४ क्विंटल (४ हजार १४० किलो) असून, त्याची किंमत अंदाजे साडेतीन लाख रुपये आहे.

या घटनेची माहिती समोर आल्यानंतर फिर्यादी निलेश बिचकुंडे यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली होती. सुरुवातीला आरोपी अज्ञात असल्याने पोलिसांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी सहा संशयित आरोपींना अटक केली असून, त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेला तूरडाळीचा माल हस्तगत करण्यात आला आहे.या प्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम 305 व 354(1)(ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून चोरीच्या घटनेबाबत अधिक माहिती घेतली जात असून, या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास पोलिसांकडून केला जात आहे.साडेतीन लाखांचा तूरडाळीचा माल चोरीला गेल्याने एमआयडीसी परिसरात खळबळ उडाली होती. मात्र, पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत सहा आरोपींना अटक करून चोरीचा माल ताब्यात घेतल्याने या प्रकरणाचा उलगडा झाला आहे.

## लिनेस क्लब अकोला तर्फे दोन ज्युनिअर क्लबची स्थापना

प्रतिनिधी १५ सप्टेंबर







**अकोला:** लिनेस क्लबच्या प्रांत अध्यक्ष लिनेस कल्पना देशमुख यांच्या उपस्थितीत, पीडीपी लिनेस स्वाती झुनझुनवाला यांच्या मार्गदर्शनाखाली आणि लिनेस क्लब अध्यक्ष लिनेस राजेश्री समनपुरे यांच्या अध्यक्षतेखाली 31 रोजी दोन ठिकाणी ज्युनिअर क्लबची स्थापना करण्यात आली. स्वर्गीय प्रकाश देशमुख माध्यमिक शाळेत ज्युनिअर क्लब इंचार्ज चंदा गवंडे, एकता मेश्राम - प्रेसिडेंट, अंकिता मेश्राम - सेक्रेटरी, गुंजन चौहान - ट्रेझरर यांनी कार्यभार स्वीकारून शपथ घेतली. यावेळी "जल वाचवा" या विषयावर 30 पेक्षा जास्त रंगारंग पोस्टर्सचे प्रदर्शन करण्यात आले.

आर.डी.जी. विद्या मंदिर, सिव्हिल लाईन येथे स्थापना होऊन ज्युनिअर क्लब इंचार्ज मंजूषा माली, समीक्षा वानखेडे - प्रेसिडेंट, अदिती शिरसाट - कोषाध्यक्ष, शुभांगी इंगले - सेक्रेटरी. शपथविधीनंतर प्लास्टिक निर्मूलन जनजागृती करण्यात आली. प्लास्टिक पिशव्यांऐवजी ज्यूट बॅगचा वापर करण्याचा संदेश देण्यात आला, ज्यावर *"We Can Together - एकत्र येऊया, उज्वल समाज घडवूया" असा संदेश होता. प्रांत अध्यक्ष कल्पना देशमुख यांनी मंजू माली व त्यांच्या संपूर्ण टीमचा सत्कार केला. क्लब अध्यक्षांची नात सायशा समानपुरे हिने झिरो बजेटमध्ये सुंदर मुकुट तयार केले, ते मुकुट प्रांत अध्यक्षांना घालून सेलिब्रेशन करण्यात आले. यावेळी कोषाध्यक्ष अलका उमाले उपस्थित होत्या. लिनेस क्लब नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. लिनेस इंदु तिवारी यांनी दोन कर्णबधिर मुलांना श्रवणयंत्र प्रदान केले, तर लिनेस आशा विरवानी, लिनेस इंदुमती मोहता व लिनेस सुमित्रा खेतान यांच्या वतीने एका दिव्यांग महिलेला ट्रायसायकल प्रदान करण्यात आली.

## हातभट्टीवर पोलिसांचा छापा; 7 हजाराचा माल जप्त

**मूर्तिजापूर :** शहरातील वडरपुरा परिसरात गावठी हातभट्टीची दारू विक्रीसाठी बाळगणाऱ्या एका व्यक्तीविरुद्ध मूर्तिजापूर शहर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत ३८ लिटर गावठी हातभट्टीची दारू व साहीत्य असा एकूण ७ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे १३ रोजी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास समाज मंदिराच्या मागे, वडरपुरा, मूर्तिजापूर येथे पोलिसांनी पंचांसमक्ष छापा टाकला. यावेळी आरोपी राहुल सुरेश घोरसडे (वय ४०, रा. सिद्धार्थ नगर, मूर्तिजापूर) याच्या ताब्यात दोन प्लास्टिक कॅनमध्ये गावठी हातभट्टीची दारू आढळून आली.

## बागडे लेआऊटमध्ये मध्यरात्री बिबट्या सीसीटीव्हीत कैद

प्रतिनिधी १५ सप्टेंबर



**अमरावती :** वडाळी प्रभाग क्रमांक ९ अंतर्गत येणाऱ्या बागडे लेआऊट परिसरात बिबट्याचा वावर पुन्हा एकदा समोर आला आहे. १४ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री तब्बल १ वाजून २७ मिनिटांनी राहुल मेश्राम यांच्या घरासमोरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात बिबट्या स्पष्टपणे कैद झाला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. राहुल मेश्राम यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा बिबट्या या परिसरात नेहमीच येत असून यापूर्वी त्याने परिसरातील अनेक कुत्र्यांची शिकार केल्याचेही सांगण्यात येत आहे. बागडे लेआऊट परिसरात मोठ्या संख्येने लहान मुले खेळत असतात, तर अनेक ज्येष्ठ नागरिक सकाळच्या वेळी मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडतात. अशा परिस्थितीत बिबट्याचा वारंवार होणारा वावर नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने गंभीर बाब असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. बिबट्याच्या वावराचे सीसीटीव्ही फुटेज समोर आल्यानंतरही वनविभागाकडून या समस्येची गांभीर्याने दखल घेतली जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यानंतरच वनविभाग कारवाई करणार आहे का, असा संतप्त सवालही स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. बागडे लेआऊट परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करून वनविभागाने तातडीने पाहणी करावी, बिबट्याचा शोध घेऊन त्याचा बंदोबस्त करावा आणि आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# खामगावातील अनेक रस्ते खड्डेमय कंबर व मणक्यांचे विकार वाढले !

## ज्येष्ठ कार्यकर्ते बापू करंदीकर यांनी प्रशासनाचे वेधले लक्ष

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**खामगाव :** शहरातील प्रमुख मार्गाची दशा पालटत असली तरी प्रत्यक्षात अनेक रस्ते आजही खड्डेमय आहेत. अशा रस्त्यांवरुन नेहमी ये-जा करणाऱ्या वाहन चालकांच्या अनेक समस्या आहेत. काहींना तर कंबर, मणका व पाठदुखीच्या विकारांना सामोरे जाण्याची वेळ आली आहे. गेल्या ३ वर्षापूर्वी आमदारांनी सर्व रस्ते चकचकीत केले जातील. असे म्हटले होते. प्रत्यक्षात सध्या असे झालेले दिसत नाही. असा आरोप यशवंत वसंतराव करंदिकर उर्फ बापू करंदिकर यांनी एका



प्रसिध्दीपत्रकाव्दारे केला आहे.

शहरातील प्रमुख रस्ते व वस्त्यांकडे जाणारे काही रस्ते चांगले करण्याकरिता स्थानिक पदाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे. शहरातील काही रस्त्यांवर दुचाकीवरुन फेरफटका मारला तर खरे चित्र दिसून येईल. जे रस्ते सिमेंटचे करण्यात आले आहे ते आजही अर्धवट असून अनेक ठिकाणी जोडलेले सुध्दा नाहीत. शहरातील फेरफटक्याअंती काही रस्त्याचे विदारक चित्र समोर आले आहे. यामध्ये कोर्ट ते घाटपूरी नाका पुलासह फरशी ते मढी तसेच घाटपुरी नाका,फरशी ते शिवाजी वेस, पुढे दंडे स्वामी मठ, फरशी ते राणा प्रताप कमान, रेल्वे मालधक्का ते जि. व्ही. मेहता विद्यालय कोपरा, जलालपूरा, मोठी देवीच्या पुढे वळण ते आठवडी बाजार कोपरा, काँग्रेस भवन जवळ पुलाजवळचा ७० ते ८० मिटर रस्ता, विकमसी चौक ते चांदमारी, रायगड कॉलनी ते केला पोस्ट समोर, देशमुख मंगल कार्यालय ते चंद्रशेखर आझाद चौक (जलंब नाका) अशा काही प्रमुख रस्त्यांची दुर्दशा समोर येते अनेक ठिकाणी चुकीचे स्पीड ब्रेकर टाकण्यात आले. नविन पाईपलाईन टाकली तरी काही ठिकाणी लिकेज असून त्यात घाण पाणी जिरपते या व अशा अनेक समस्याशहरात असल्याचेही करंदिकर यांनी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# राष्ट्रीय लोकअदालत मध्ये जिल्हयात 1209 प्रकरणे निकाली

## रूपये ११ कोटी ५ लाख रूपयांचे तडजोडी शुल्क वसुल

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**मलकापूर :** बुलढाणा जिल्हयातील सर्व न्यायालयांमध्ये दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालत चे आयोजन केले होते. या लोकअदलातीमध्ये एकुण २५६१३ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी, १२०९ प्रकरणे आपसात निकाली काढण्यात आली असून एकुण ११ कोटी ५ लाख ४ हजार ६५ रूपये तडजोड शुल्क वसुल करण्यात आले. राष्ट्रीय विधीसेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधीसेवा प्राधिकरण मुंबई यांच्या आदेशान्वये जिल्हा विधीसेवा प्राधिकरण बुलढाणा तथा सर्व जिल्हा वकील संघ यांचे संयुक्त विद्यमाने उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती श्री. महेंद्र निरलीकर साहेब यांचे प्रमुख उपस्थितीत व प्रधान जिल्हा न्यायाधिश श्रीचंद जगमलानी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायाधिश पी.बी. जाधव साहेब व अतिरीक्त जिल्हा न्यायाधिश आर.बी. गीरी साहेब, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अनुप जैस्वाल साहेब, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर ठाकरे साहेब, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर एस. एस. महाले साहेब, न्यायदंडाधिकारी ए.यु. मोटे साहेब यांचे प्रमुख उपस्थितीत ई-सेवा केंद्राचे उद्घाटन मा. न्यायमुर्ती निरलीकर साहेब यांचे हस्ते करण्यात आले व सर्वांचे प्रमुख उपस्थितीत सदर लोक न्यायालय यशस्वीरित्या संपन्न झाले. यावेळी मालती भागवत वराडे, रा. नरवेल, ता. मलकापूर, जि. बुलढाणा यांनी त्यांचा मुलगा धिरज वराडे यांचा दि. ०३.०२.२०२४ रोजी अकोला जिल्ह्यातील माना पोलिस स्टेशन हद्दीत झाल्याने, त्यांनी मलकापूर येथे मोटर अपघात प्राधिकरण श्री. पी. बी. जाधव साहेब यांचेकडे नुकसान भरपाईचा दावा दाखल केला होता. तो दावा या लोक अदालतीमध्ये एचडीएफसी इरगो या इंन्शोरन्स कंपनी व त्यांचे वकील ॲड. भैरव पांडे साहेब व अर्जदार मालती वराडे यांचे वकील ॲड. हरीश रावळ, ॲड. केवलसिंग परमार, ॲड. चरणसिंग राजपुत यांनी आपसात चर्चा करून सदर प्रकरण रू. ४२,००,०००/-अक्षरी बेचाळीस लक्ष रूपयांमध्ये आपसात तडजोड केली. त्याबाबतचा धनादेश न्यायमुर्ती श्री. महेंद्र निरलीकर साहेब, प्रधान जिल्हा न्यायाधिश श्रीचंद जगमलानी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा न्यायाधिश पी.बी. जाधव साहेब व अतिरीक्त जिल्हा न्यायाधिश आर.बी. गीरी साहेब, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अनुप जैस्वाल साहेब, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर ठाकरे साहेब, दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर एस. एस. महाले साहेब, न्यायदंडाधिकारी ए.यु. मोटे साहेब यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी न्यायमुर्ती महेंद्र निरलीकर साहेब यांनी संपूर्ण कोर्ट परिसराची पाहणी करून स्वच्छतेचे कौतुक केले. तसेच कोर्ट परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लावले आहेत त्याबाबत सर्व न्यायमुर्ती व वकील संघाचे पर्यावरण हित जोपासल्याबाबत कौतुक केले. तसेच वृक्षा रोपण महाराष्ट्रातील प्रत्येक कोर्ट परिसरात व शासकीय कार्यालयात असेच झाले तर महाराष्ट्रात पर्यावरण टिकुन राहील असे न्यायमुर्ती महेंद्र निरलीकर साहेब यांनी म्हटले. मलकापूर कोर्टातील सर्व न्यायमुर्ती व सर्व वकीलांचे कौतुक केले. लोक न्यायालय यशस्वी करणेसाठी सर्व न्यायाधिश साहेब, वकील संघ, कोर्ट कर्मचारी, नगर पालिका व सा.बां. विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी आणि पक्षकार यांचे सहकार्य लाभले व हे लोक न्यायालय मोठ्या प्रमाणात यशस्वी झाले.

# अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध तामगाव पोलिसांत गुन्हा

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**संग्रामपूर :** मेडिकलमधून औषधी घेऊन पायी रस्ता ओलांडत असलेल्या ६३ वर्षीय वृद्धाला भरधाव आलेल्या अज्ञात दुचाकीस्वाराने जोरदार धडक दिली. या अपघातात गंभीर जखमी झालेल्या वृद्धाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. ही घटना संग्रामपूर शहरातील भारतीय स्टेट बँक शाखेजवळ ११ सप्टेंबर रोजी दुपारी सुमारे १२ वाजता घडली. याप्रकरणी १४ सप्टेंबर रोजी तामगाव पोलिस ठाण्यात अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, संग्रामपूर तालुक्यातील पळशी येथील सुरेश सिताराम हिरोळकर (वय ६३) हे दि. ११ सप्टेंबर रोजी संग्रामपूर शहरातील एसबीआय शाखेजवळील एका मेडिकलमधून औषधी घेऊन पायी रस्ता ओलांडत होते. त्यावेळी अज्ञात दुचाकीस्वाराने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात हिरोळकर गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाला. अज्ञात दुचाकीस्वाराने दुचाकी भरधाव व निष्काळजीने चालविल्याने हा अपघात घडला आणि त्यात हिरोळकर यांचा मृत्यू झाल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. याप्रकरणी अक्षय सुरेश हिरोळकर (रा. पळशी, ता. संग्रामपूर, हल्ली मुक्काम कात्रज, पुणे) यांनी तामगाव पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादीवरून अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २८१ व १०६ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस अंमलदार संतोष गाडे करीत आहेत.

# मी हातवारे केले नाहीत, फक्त बोललो!

## गुन्हा दाखल झाल्यावर संजय गायकवाड यांची प्रतिक्रिया

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**बुलढाणा :** आमदार संजय गायकवाड यांच्यावर एका वक्तव्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाजप आमदार श्वेता महाले यांच्याबाबत विचारलेल्या प्रश्नावर भाष्य करताना त्यांनी केलेल्या वक्तव्यावरुन हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर आमदार संजय गायकवाड यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. 'गुन्हा दाखल झाला आहे. त्यामध्ये अश्लील हावभाव करणे, अश्लील हातवारे करणे अशा प्रकारचा गुन्हा आहे. मी बोललो आहे की, कुठलीही महिला बाप होऊ शकत नाही. त्यासाठी पुरुषाचे शरीर आवश्यक असते. मला वाटते की माझे कुठलेही हातवारे नाही आणि तसा माझा उद्देश नाही. मी सांगितले होते की त्या माझ्या ताई आहेत', असे संजय गायकवाड म्हणाले.

यामध्ये १०० टक्के राजकारण आहे आणि महाराष्ट्रात आम्हाला बदनाम करण्याचा प्रयत्न आहे. ज्या महाराष्ट्रात ६ हजार पोरींचे संसार बसवले, ज्यांनी २५० ते ३०० मुली लव जिहादमधून वाचवलं, ज्या पळून गेलेल्या १ हजार, २ हजार मुली वापस आणल्या, त्या माणसावर अशा प्रकारचं लाच्छंद लावले, ते हलकटपणाचे लक्षण आहे. त्यांच्या दिवाळखोर बुद्धीची



मला कीव येते. ठिक आहे. तुम्ही पक्ष वाढवा. शेवटी आपण महायुतीमध्ये आहोत, अशी भूमिका संजय गायकवाड यांनी मांडली. भविष्यात महायुती झाली तर फायदा आम्हाला होईल. इतक्या हलकट लेवलवर कोणी जाऊ शकत नाही. तसे आमदार लेवलच्या व्यक्तीला शोभत नाही. कोणत्या माणसावर, ज्याने तोंडभरून ताई म्हटले किंवा ज्यांनी इतक्या मुलींचे रक्षण केलं, त्याच्यावर हा आरोप करणे योग्य नाही', असं संजय गायकवाड म्हणाले. आम्ही ४८२ मध्ये एफआयआर क्रॅश करणार, हा टेक्निकल गुन्हा आहे. कारण हा गुन्हा कोर्टात टिकू शकत नाही. हा काही डायरेक्ट विनयभंगपण नाही. त्यामुळे आम्ही कोर्टात जाणार', असं संजय गायकवाड म्हणाले.

**मंत्रालयासमोर आंदोलनाचा इशारा**

संजय गायकवाड यांना पत्रकारांनी पुढे काय करणार? असा प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी 'गरज पडल्यास मंत्रालयासमोर आंदोलन किंवा उपोषण करेन. आमच्या जिल्ह्यात हे चाललंय ते थांबलं पाहिजे. महाराष्ट्र सरकार बदनाम होत चालले. मुख्यमंत्रीदेखील बदनाम होत आहे आणि आपला पक्ष पण बदनाम होत चालला आहे', असं गायकवाड म्हणाले.

**पोलिसांवर केले आरोप**

जो माणूस कधीही बाईबद्दल वाईट एकूण घेत नाही, अशा प्रकाराचा गुन्हा दाखल करणं, त्यामुळे भावना दुखावल्या आहेत. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातून फोन येतो आणि खोटी कारवाई केली जाते. खऱ्या लोकांवर अन्याय होत आहे. पोलिसांनी पारदर्शी वागले पाहिजे, अशी भूमिका संजय गायकवाड यांनी मांडली.

# प्रा. यमुना माळी (निलखन )राज्यस्तरीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित

## शिक्षण, संस्कार, आणि समाजकार्यातील योगदानाचा गौरव

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**मलकापुर:** जि. प. मराठी उच्च प्राथमिक शाळा माकनेर येथील शाळेत कार्यरत असलेल्या प्रा.सौं. यमुना माळी (निलखन )यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस शिक्षक सेल यांच्या वतीने "राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६"प्रदान करून गौरविण्यात आले. शैक्षणिक, सामाजिक व विद्यार्थी हिताच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा प्रतिषठेचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणासोबतच सुसंस्कार, राष्ट्रसेवा, व चारित्र्यनिर्मिती, आणि सामाजिक बांधिलकीची भावना रुजविण्यासाठी त्यांनी केलेल्या कार्याचा गौरव या पुरस्कारद्वारे करण्यात आला. समाजातील विशेष



गरजू विद्यार्थी, महिला व मुलींच्या हितासाठी, सबलीकरणासाठी त्यांनी गेल्या २५ वर्षांपासून करीत असलेल्या कार्यासाठी त्यांचा हा सन्मान केला गेला आहे. हा पुरस्कार आमदार साजिद पठाण खान, पदवीधर संघांचे आमदार धीरज लिंगाडे, प्रदेश काँग्रेस सेलचे अध्यक्ष प्रकाश सोनवणे, प्रकाश तायडे व काँग्रेस चे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल समाजा तील विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# ब्राह्मण समाज महिला व युवती मंडळाची कार्यकारिणी

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**खामगाव :** अखिलभारतीय ब्राह्मण महासंघ ही देशभरातील समस्त ब्राह्मण समाजाच्या आर्थिक सामाजिक व शैक्षणिक सर्वांगीण विकासासाठी झटणारी देश पातळीवरील संघटना आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष गोविंदजी कुलकर्णी महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष निखिल लातूरकर महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्ष सौ. नीताताई कुलकर्णी बुलढाणा जिल्हाध्यक्ष किशोरकुमार मिश्रा तसेच खामगाव शाखेचे अध्यक्ष मनोज जोशी कार्याध्यक्ष जितेंद्रपुरोहित यांच्या मार्गदर्शनाखाली महिला आघाडीची कार्यकारणी गठीत करण्यात आली. विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत सौ. मीनल मनीष सकळकळे यांची खामगाव शाखा ब्राह्मण समाज महिला व युवती आघाडीच्या अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली.

९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता श्री लेडीज कलेक्शन येथे महिला कार्यकारणीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला खामगाव नगर परिषदेच्या उपाध्यक्ष सौ. संतोष पुरोहित, नगरसेविका नीलिमाताई डोरले भाजपा बुलढाणा महिला उपाध्यक्ष आघाडीच्या सौ. शिवानी कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीत नियुक्त केलेल्या कार्यकारिणीत सौ. मनीषा सचिन चांदूरकर कार्याध्यक्ष, सौ. गायत्री कालिदास धानवी उपाध्यक्ष, सौ प्रियंका मंगेश सप्रे उपाध्यक्ष, कु. डॉ. प्राजक्ता मोहनराव हसबनीस सचिव, सौ. जानवी प्रभाकर पाठक-सहसचिव, सौ. स्वाती आमले कोषाध्यक्ष, सौ. संतोष पुरोहित सल्लागार, सौ. नीलिमाताई डोरले सल्लागार, सौ. शिवानी ताई कुलकर्णी- सल्लागार, सौ. संपदा जोशी- सल्लागार, ॲड. कु. मधुलिका ताम्हण विधी सल्लागार, सौ पूजा प्रसाद कापरे सदस्य, सौ. डॉ. पूजा तेरेदेसाई सदस्य, सौ. छाया अभय दिढे सदस्य, सौ. गौरी पुरोहित सदस्य, सौ. सुवर्णाधर्माधिकारी सदस्य, सौ. संध्या चापडगावकर सदस्य, सौ. नैना कुलकर्णी सदस्य, सौ. मनीषा टिपरे सदस्य, सौ. तृप्ती कुलकर्णी सदस्य, सौ. मंजुषा शेवाळे सदस्य, सौ. विद्या सराफ सदस्य, सौ. अपूर्वा ताम्हण सदस्य, सौ. मनीषा गजानन जोशी सदस्य, सौ. अर्पिता तिडोळे सदस्य, सौ. मायताई राजवैद्य सदस्य, सौ. सोहळकर ताई सदस्य, सौ. अंजली पळसोदकर सदस्य, सौ. सोनाली कुलकर्णी सदस्य, सौ. रेखा जोशी सदस्य, सौ. रश्मी वरंगावकर सदस्य, सौ. कल्याणी पाठक सदस्य, सौ. कोमल पाठक सदस्य, सौ. नीलिमा संजय कुलकर्णी सदस्य, सौ. अश्विनी घटवाई सदस्य. ३६. सौ. मृणाल जोशी सदस्य, सौ. प्राजक्ता पंडित सदस्य, सौ. छाया देशपांडे सदस्य, सौ. साक्षी आकणकर सदस्य यांचा समावेश आहे. वरील सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# शिवांगी बेकर्स कामगारांच्या उपोषणाची सांगता

**खामगाव :** येथील शिवांगी बेकर्स या बिस्कीट कंपनीच्या कामगारांनी काही दिवसापासून आमरण उपोषणाला सुरुवात केली होती. याबाबत त्यांच्या मागण्यांचा पाठपुरावा ना. ॲड. आकाशदादा फुंडकर यांच्या निर्देशानुसार कामगार विभाग करीत होते. १३ सप्टेंबर रोजी शिवांगी बेकर्सचे मालक व अधिकारी यांच्यात बैठक व कामगार प्रतिनिधी यांचेशी चर्चा झाली. अखेर कामगार अधिकाऱ्यांच्या हस्ते रविवारी रात्री १० वाजताच्या सुमारास शीतपेय देऊन उपोषणाची सांगता करण्यात आली.

१३ सप्टेंबर रोजी कामगार मंत्री ना. ॲड. आकाशदादा फुंडकर हे खामगाव येथे आले असता सर्वप्रथम त्यांनी शिवांगी बेकर्सच्या कामगारांच्या उपोषण मंडपात भेट देऊन त्यांच्याशी चर्चा केली. यावेळी कामगार विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते. या कामगारांच्या १६ मागण्यांपैकी ९० टक्के मागण्या मंजूर करण्यात आल्या असल्यामुळे तसेच उर्वरित मागण्यांबाबत बुलढाणा कार्यालयात बैठक आयोजित करण्याचे आदेश देखील यावेळी कामगार मंत्री ना. ॲड. आकाशदादा फुंडकर यांनी दिले. त्यापैकी वेतन वाढीचे व अजून काही मागण्यांबद्दल उद्यापासून कामगार विभागाच्या बुलढाणा येथे कार्यालयात सदर कंपनीचे संचालक व कामगार अधिकाऱ्यांच्या तसेच कामगार प्रतिनिधींच्या दरम्यान चर्चा होऊन यातून कामगारांच्या हिताचे कामगार कायद्यानुसार रक्षण करण्याचे आदेश ना. ॲड आकाशदादा फुंडकर यांनी दिले आहेत.

# आता रेशन दुकानातून लाभार्थ्यांना मिळणार ज्वारीऐवजी मका!

## धान्य वितरणाबाबत पुरवठा विभागाची माहिती

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**खामगाव :** सप्टेंबर महिन्याच्या धान्य वितरणात अंत्योदय अन्न योजना आणि अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना ज्वारीऐवजी मका देण्यात येणार आहे. शासकीय धान्य गोदामात उपलब्ध असलेल्या मक्याचा वापर सप्टेंबर महिन्याच्या वितरणासाठी करण्यात येणार असल्याची माहिती पुरवठा विभागाने दिली आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी, बुलढाणा यांच्या निर्देशानुसार, ऑगस्ट २०२६ च्या धान्य वितरणानंतर शासकीय धान्य गोदाम, खामगाव येथे शिल्लक राहिलेल्या मक्याचे सप्टेंबर महिन्याच्या वितरणासाठी नियतन करण्यात आले आहे.

त्यानुसार खामगाव शहरी भागातील स्वस्त धान्य दुकानांशी संलग्न अंत्योदय अन्न योजना आणि अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना ज्वारीऐवजी मका वितरित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे सप्टेंबर २०२६च्या धान्य वितरणात संबंधित शिधापत्रिकाधारकांना नियमानुसार ज्वारीऐवजी मका उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शहरी भागातील संबंधित लाभार्थ्यांनी याची



नोंद घ्यावी, असे तालुका निरीक्षण अधिकारी, खामगाव, रोशनी फुलझले यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

शिधापत्रिकाधारकांनी आपल्या संबंधित स्वस्त धान्य दुकानातून शासनाच्या नियमानुसार उपलब्ध होणारे धान्य प्राप्त करून घ्यावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.

**लाभार्थ्यांमध्ये नाराजी!**

सप्टेंबर महिन्याच्या धान्य वितरणात ज्वारीऐवजी मका देण्याच्या निर्णयामुळे संबंधित शिधापत्रिकाधारकांमध्ये नाराजी असल्याचे दिसून येत आहे. नियमितपणे मिळणाऱ्या धान्याच्या प्रकारात बदल करण्यात आल्याने काही लाभार्थ्यांकडून याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत. उपलब्ध शासकीय साठ्याचा उपयोग करण्यासाठी हा बदल करण्यात आल्याचे पुरवठा विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**चांगल्या प्रतीचे धान्य देण्याची मागणी**

मागील महिन्याच्या धान्य वितरणात काही ठिकाणी अतिशय निकृष्ट दर्जाचे धान्य मिळाल्याच्या तक्रारी लाभार्थ्यांनी केल्या होत्या. आता सप्टेंबरमध्ये ज्वारीऐवजी मका वितरित केला जाणार असल्याने धान्याच्या गुणवत्तेकडे पुरवठा विभागाने विशेष लक्ष द्यावे. लाभार्थ्यांना निकृष्ट धान्य न देता चांगल्या प्रतीचे, स्वच्छ आणि वापरण्यायोग्य धान्य उपलब्ध करून द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# खामगावात 'स्वाइन फ्लू'चा शिरकाव; रुग्ण पॉझिटिव्ह, प्रकृती स्थिर!

## नमुने तपासणीसाठी १४ सप्टेंबर रोजी आरोग्य विभागाचे पथक गावात दाखल

प्रतिनिधी १५ सप्टेंबर

**खामगाव :** तालुक्यातील एका गावातील रुग्णाचा स्वाइन फ्लू (एच१एन१) तपासणी अहवाल पॉझिटिव्ह आला आहे. संबंधित रुग्णावर उपचार सुरू असून, त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली. दरम्यान, खबरदारीचा उपाय म्हणून आरोग्य विभागाचे पथक संबंधित गावात दाखल झाले असून, रुग्णाच्या कुटुंबीयांसह संपर्कात आलेल्या व्यक्तींची तपासणी करण्यात येत आहे.संबंधित रुग्ण चिखली तालुक्यातील अमडापूर येथे कामासाठी गेला होता. प्रकृती खालावल्याने तो गावी परतला. त्यानंतर नांदुरा येथील तीन खासगी रुग्णालयांत त्याच्यावर उपचार करण्यात आले. प्रकृतीत अपेक्षित सुधारणा न झाल्याने डॉक्टरांनी अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात उपचार घेण्याचा सल्ला दिला. त्यानुसार अकोल्याला गेल्यानंतर संबंधित रुग्ण उपचार न घेताच खामगावला परतला. त्यानंतर खामगाव येथील एका खासगी रुग्णालयात दाखल झाल्यावर इतर तपासण्यांसह एच१एन१ची तपासणी करण्यात आली. त्याचा अहवाल पॉझिटिव्ह आला.

**आरोग्य विभागाचे पथक गावात दाखल !**

खामगाव तालुका आरोग्य विभागाचे पथक सोमवारी संबंधित गावात दाखल झाले. आरोग्य कर्मचाऱ्यांनी रुग्णाच्या कुटुंबीयांची तपासणी केली. रुग्णाच्या पत्नीला सर्दी व खोकल्याची लक्षणे आढळल्याने तिचीही वैद्यकीय तपासणी करण्यात आली. कुटुंबीय व संपर्कातील व्यक्तींचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत आरोग्य विभागाकडून सूचना देण्यात आल्या.

**कसा होतो संसर्ग ?**

इन्फ्लुएंझा विषाणूचा प्रसार प्रामुख्याने संक्रमित व्यक्ती खोकताना, शिंकताना किंवा बोलताना बाहेर पडणाऱ्या श्वसनातील थेंबांमधून होतो. संक्रमित व्यक्तीच्या जवळ राहिल्यास संसर्गाचा धोका वाढतो.

दूषित वस्तू किंवा पृष्ठभागाला स्पर्श केल्यानंतर नाक, तोंड किंवा डोळ्यांना स्पर्श केल्यानेही संसर्ग होऊ शकतो. फ्लूची लागण झालेल्या व्यक्तिकडून आजाराची लक्षणे दिसण्याच्या साधारण एक दिवस आधीपासून संसर्ग होऊ शकतो व पाच ते सात दिवसांपर्यंत तो पसरू शकतो.

» रुग्णाची प्रकृती स्थिर आहे. आरोग्य विभागाच्या पथकाने संबंधित गावात जाऊन कुटुंबीय व संपर्कातील व्यक्तींची तपासणी केली आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.
**डॉ. अभिलाश खंडारे,** तालुका आरोग्य अधिकारी, खामगाव

**रुग्णाच्या संपर्कातील व्यक्तींची तपासणी**

रुग्ण ज्या ठिकाणी कामासाठी गेला होता, तसेच उपचारादरम्यान ज्या डॉक्टर व व्यक्तींच्या संपर्कात आला, त्यांची आवश्यकतेनुसार तपासणी करण्याच्या सूचना आरोग्य विभागाकडून देण्यात येणार आहेत.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय श्री छत्रपती शिवाजी महाराज नगर परिषद काम्पलेक्स, रेल्वे स्टेशन समोर खामगाव येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135